# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र-११९** **दिनांक - २६/०३/२०२४**

## बिहार राज्यातुन निर्घुण खुन करुन पळुन आलेल्या आरोपीत यास ताब्यात घेण्यास नायगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

बिहार राज्य जिल्हा- नवादा मधील रोहा पोलीस ठाणे हद्दीतील बारापाण्डेया या गावातील फिर्यादी नामे सरितादेवी सुनिल रंजक हया त्यांचे पती हरवील्याची तक्रार देणे करीता पोलीस ठाण्यात आल्या होत्या. त्याचवेळी बारापाण्डेया गावाच्या हद्दीत एक ६ तुकडयांत कापलेले मृत पुरुषाचे शव मिळुन आले होते. सदरचे शव फिर्यादी सरितादेवी रंजक यांना दाखविले असता सदरचे शव त्यांच्या पतीचेच असल्याचे फिर्यादी सरितादेवी रंजक यांनी ओळखले. त्यावरुन फिर्यादी सरितादेवी रंजक यांनी अज्ञात इसमा विरुध्द तक्रार दिल्याने रोह पोलीस ठाणे (बिहार) गुन्हा रजि नं ा ८१/२०२४ भादविस कलम ३०२,२०१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान नमुद गुन्हयातील संशयीत आरोपी चिंचोटी परिसरात आला असल्याची माहिती बिहार पोलीसांनी मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ -२ मि.भा.व.वि. यांना कळवीली. सदरची माहिती मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ -२ यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नायगांव पोलीस ठाणे यांना देऊन संशयीत आरोपीचा शोध घेण्याचा आदेश दिला होता. मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनखाली नायगांव गुन्हे प्रकटीकरण पथकाचे दोन वेगवेगळे पथके बनवुन सदर आरोपीत यांचा कसुन शोध घेतला असता. संशयीत आरोपी नामे सुजित उर्फ सुरज उमेश सिंग वय-३१ वर्षे राहणार-शॉप नं ०३, साडी कम्पाऊण्ड,पाटील पाडा,चिंचोटी, कामन ता. वसई जि. पालघर मुळ राह. गांव बडकी खडां, पोलीस स्टेशन सहर, जि भोजपुर राज्य बिहार हा मिळुन आला. सदर आरोपीत याच्याकडे नमुद गुन्हयाच्या अनुंशगाने कौशल्यपुर्ण चौकशी केली असता सदर आरोपीत यांने वरील गुन्हा त्याचा साथिदार नामे रंजनीश शर्मा राह. रोह, जि. नवादा राज्य बिहार याच्या मदतीने केला असल्याची कबुली दिली. तसेच सदरचा गुन्हा त्याने सरितादेवी सुनिल रंजक (मयताची पत्नी/तक्रारदार) हिच्या सांगण्यावरुन केला असल्याचे सांगीतल्याने बिहार पोलीसांना गुन्हयातील आरोपीत नामे रंजनीश शर्मा व सरितादेवी सुनिल रंजक हिस ताब्यात घेण्याबाबत कळविले.

**सदर आरोपीताकडे अजुन काही अशाच प्रकाराचे गुन्हे केले् अगर कसे याबाबत अधिक कसुन व कौशल्यपुर्ण चौकशी केली असता सदर आरोपीत याने १६ वर्षा पुर्वी जुन्या भांडणाचा मनात राग धरुन मौजे बरडकी खारांकला, सहर पोलीस ठाणे राज्य बिहार या गावचा मुखीया नामे राजकुमार कानु व त्याचा मित्र नामे यादव यांचा दुहेरी खुन केला असल्याची कबुली दिली.सदरबाबत सहर पोलीस ठाण्यास कळविण्यात आले असुन सदर आरोपीतास पुढील योग्य त्या कायदेशीर कार्यवाही करीता रोह पोलीस स्टेशन, जि. नवादा, राज्य बिहार यांच्या ताब्यात दिले आहे.**

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, पोलीस निरीक्षक (प्रशा.) श्री. मंगेश अंधारे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/गणेश केकान, सपोनि/रोशन देवरे, पो.अंम.सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, संजय बनसोडै, मसुब/सिध्देश्वर क्षीरसागर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




**----0000----**